क्रमांक : ३५

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## मंगळवार, दिनांक ८ मार्च, २०२२/ १७ फाल्गुन, १९४३ (शके)

३५. महाराष्ट्र विधानसभा नियम १०६ (३) प्रमाणे बॅलटव्दारे काढण्यात आलेल्या आणि बुधवार, दिनांक १६ मार्च, २०२२ रोजी सभागृहात चर्चेसाठी घेण्यात येणाऱ्या अशासकीय ठरावांच्या सूचना देणाऱ्या सदस्यांची क्रमवार सूची खालीलप्रमाणे आहे.

(१) **श्रीमती यामिनी जाधव, वि.स.स. यांचा ठराव क्र. ९**

"राज्यात अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असून या कारखान्यातील प्रदूषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदी काठावरील अनेक गावांमध्ये विशेषत: कोकण व पश्चिम महाराष्ट्रात नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झाले असून त्यामुळे रहिवाशांच्या आरोग्यावर आणि मच्छीमार बांधवांच्या उपजीविकेच्या साधनांवर होणारा विपरीत परिणाम लक्षात घेता राज्यातील जलप्रदूषण समस्येवर उपाय शोधून त्यावर प्रभावीरीत्या आळा घालण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२) **श्री.राजेश एकडे, वि.स.स. यांचा ठराव क्र. १८५**

"विदर्भात नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला कोरडा दुष्काळ असूनही पिक विमा नुकसान भरपाईपासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषांमुळे शेतकरी वंचित राहत असणे, यास शंभर वर्षे जुनी ब्रिटीश कालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी व उंबरठा उत्पन्न काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३) **श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स. यांचा ठराव क्र. २५५**

"शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, कीटकनाशके यांच्या किमतीमध्ये सतत होणारी वाढ तसेच शेतकऱ्यांना शेती मालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारित असे शेती मालाचे भाव मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

.. २/-

(४) **श्री.सुभाष देशमुख, वि.स.स. यांचा ठराव क्र. १५०**

"परकीय मुघल राजवटीच्या खाणाखुणा पुसून महाराष्ट्राच्या जाज्वल्य इतिहासाच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी व राज्याची अस्मिता जपण्यासाठी "औरंगाबाद" या शहराचे "संभाजीनगर" असे नामांतर करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(५) **श्री.मंगेश चव्हाण, वि.स.स. यांचा ठराव क्र. २९५**

"खानदेशात सिंचनाच्या अपूर्ण सोयी सुविधा असल्यामुळे या भागातील शेतकरी वर्षानुवर्षे नुकसान सहन करीत असून अनेक सिंचनविषयक योजना, मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्यामुळे शेतकऱ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन खानदेशातील सिंचनविषयक प्रगती होण्याच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणावर सिंचनाच्या सोयी सुविधा उपलब्ध करण्यात याव्यात, तसेच शेतकऱ्यांना सिंचनविषयक साहित्य व उपकरणे शासनामार्फत उपलब्ध करून देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**विधान भवन,**
**मुंबई.**
**दिनांक : ०७ मार्च, २०२२**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**प्रत :**

१) महाराष्ट्र विधानसभेचे सन्माननीय सदस्य
२) मा उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
३) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील अधिकारी व कक्ष
५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील पक्ष कार्यालये
६) संगणक कक्ष (Website)
७) एम.के.सी.एल. (M.K.C.L.)